Vol 5 Issue 6 March 2016

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts

International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 9 | March - 2016


# ज्ञानाचे भांडार (Repositories)




हजारे बाबूराव कृष्णा

एम. कॉम, एम्.लिब.,एम.फिल. ,

ग्रंथपाल ,शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर.



**सार :**

विविध प्रकारची ग्रंथालये व माहितीची केंद्रे यांना सध्याच्या माहिती युगामध्ये ज्ञानाचे व्यवस्थापन प्रभावी माध्यमातून करणे आवश्यक ठरलेले आहे. ज्ञानाची निर्मिती व योग्य तो वापर करण्यासाठी ग्रंथालयानां ज्ञानाचे व्यवस्थापन विकसित करणे हे जबाबदारीचे कार्य पार पाडावे लागते. त्यामुळे विविध पध्दतीने ज्ञानाचे व्यवस्थापन करणे हे ज्ञान युगातील महत्वाचे कार्य, ज्ञानाचे संवर्धन व प्रसार करण्यासाठी ग्रंथालयांना पार पाडावे लागते. ज्ञानाच्या व्यवस्थापनामध्ये अंतर्भूत असलेले घटक म्हणजे माहितीचा शोध घेणे, माहिती संपादन करणे, माहितीचे संघटन करणे, माहितीची निवड करणे व माहितीचे प्रसारण करणे हे होय. या द्वारे विशिष्ट पध्दतीने वाचकांना माहिती सेवा देणे शक्य होते. या अनुषंगाने ज्ञान व्यवस्थापनाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच शैक्षणिक व संशोधन संस्थांमध्ये ज्ञानाच्या रिपॉझिटरी निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या दृष्टीने ज्ञानाचे व्यवस्थापन व ज्ञानाच्या रिपॉझिटरीचे व्यवस्थापन हे अत्यंत महत्वाचे घटक ठरले आहेत.



**शोध संज्ञा :** रिपॉझिटरी, ज्ञानभाडार, ज्ञानव्यवस्थापन, मॅनेज्ड स्टोरेज सिस्टिम, माहिती केंद्रे, नॉलेज मॅनेजमेंट.

### *1. प्रस्तावना :*

ग्रंथालय व माहिती केंद्राच्या व्यवस्थापनामध्ये ज्ञानाचे व्यवस्थापन ही नवीन संकल्पना असून त्याकडे पहाण्याचे दृष्टीकोनही विविध आहेत. उपलब्ध असणारे ज्ञान व त्याचा विकास केल्यामूळे आवश्यक ती उद्दीष्टे प्राप्त करणे सोयीचे होते. ज्ञानाच्या विकासामध्ये समाविष्ट असलेले घटक म्हणजे ग्रंथालयामध्ये उपलब्ध असणारे ज्ञान तसेच नवीन ज्ञानाची निर्मिती व बाहेरून ज्ञान उपलब्ध करणे हे होत. हे घटक प्रत्यक्ष आमलात आणण्यासाठी ज्ञान रिपॉझिटरीजची गरज आहे. त्यामुळे ज्ञानाची देवाण घेवाण तसेच शैक्षणिक व संशोधन संस्थामधील अध्ययन व अध्यापनाच्या उपक्रमांना आवश्यक ते ज्ञान सुलभ पध्दतीने देता येते. ज्या संस्था ज्ञान व्यवस्थापनामध्ये यशस्वी होतात अशा संस्थाना ज्ञानाची निर्मिती व देवाणघेवाण करणे प्रभावीपणे शक्य होत आहे.

ज्ञान व्यवस्थापनामध्ये ज्ञानाची व्याप्ती, ज्ञान उपलब्ध करून देणे, ज्ञानाचा प्रसार व विकेंद्रीकरण करणे हे अपेक्षित आहे. सध्या माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळणाची साधने उदा. नेटवर्क्स, इत्यादीद्वारे असे ज्ञानाचे व्यवस्थापन करणे सुलभ झाले आहे. विविध प्रकारच्या संस्था, संशोधन केंद्रे, औद्योगिक क्षेत्रे, कृषी क्षेत्रे इत्यादी मध्ये होत असलेले विविध प्रकारचे संशोधन व कार्य लक्षात घेता कोणत्या प्रकारचे ज्ञान आवश्यक आहे याचा शोध घेणे हे ज्ञान व्यवस्थापनामध्ये प्रामुख्याने अभिप्रेत आहे. या क्षेत्रांमध्ये निर्णय प्रक्रियेमध्ये ज्ञानाचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे ज्ञानाचे व्यवस्थापन हे मुख्यत्वे करून वरील गोष्टीवर आधारभूत ठरते. यादृष्टीने ज्ञान व्यवस्थापनामध्ये उपयुक्त असणारे ज्ञान संकलन करून त्याचे संघटन करणे व मागणीनुसार ते उपलब्ध करून देणे यासाठी व्यवस्थापनाची गरज आहे. त्यादृष्टीने ज्ञान रिपॉझिटरीची निर्मिती करणे आवश्यक ठरते.

### *2.रिपॉझिटरी म्हणजे काय ?*

रिपॉझिटरी मध्ये ज्ञान व माहिती दोन्हीचे संकलन केलेले असते. विशेषतः रिपॉझिटरीमध्ये ज्ञान किंवा माहिती ही प्रलेखामधून उपलब्ध असते. त्यामध्ये संशोधन अहवाल, सभा- संम्मेलने वृत्तांत, संशोधना विषयी माहिती त्याचबरोबर इतर प्राथमिक व द्वितियक साधने यांचा समावेश होतो. या प्रकारची साधने ही महत्वाची असून त्यामधून ज्ञानाची देवाण-घेवाण रिपॉझिटरीच्या माध्यमातून केली जाते. शैक्षणिक संस्था, संघटना यांना रिपॉझिटरीज मधून ज्ञान उपलब्ध करून दिले जाते जेणे करून संशोधन, अध्यापन व अध्ययन तसेच इतर शैक्षणिक उपक्रम यांची गुणवत्ता वाढू शकते. संस्था अंतर्गत रिपॉझिटरीमध्ये प्रिप्रिंट, पोस्ट प्रिंट, थेसिस, टेक्निकल रिपोर्ट इत्यादीचा समावेश होऊ शकतो. या संग्रहाच्या माध्यमातून संशोधन व शैक्षणिक उपक्रम यांना चालना मिळते.

रिपॉझिटरी म्हणजे 'मॅनेज्ड स्टोरेज सिस्टिम' होय. त्यामध्ये विविध स्तरावरील उदा. वैयत्तीक, संस्था व संघटना, विभागीय, राष्ट्रीय तसेच कन्सोर्शिया आधारित विविध सेवा दिल्या जातात. या सेवाद्वारे संशोधन तसेच इतर शैक्षणिक उपक्रमांना आधार दिला जातो.

### *3.रिपॉझिटरीची रचना*

रिपॉझिटरी मधून ज्ञानाचे संघटन केले जाते. त्यादृष्टीने ज्ञानाच्या रिपॉझिटरीचे दोन प्रमुख घटक आहेत. ते म्हणजे ज्ञानाचे स्ट्रक्चर व कंट्रेटस, ज्ञानाचे कंट्रेटस, हे ज्ञानाच्या स्ट्रक्चर मध्ये अभिप्रेत आहेत. ज्ञानाच्या स्ट्रक्चर मध्ये ज्ञानाची युनिट अपेक्षीत असुन कोणत्या प्रकारचे ज्ञान संकलीत करणे अभिप्रेत आहे यावरून ज्ञानाचे स्ट्रक्चर ठरते. रिपॉझिटरीमध्ये खालील गोष्टीचा प्रामुख्याने समावेश होतो.

### *3.1 नॉलेज रिफायनरी*

रिपॉझिटरी मधून ज्ञानाची निर्मिती व ज्ञानाचा प्रसार करणे यास रिफायनरी म्हणतात. या प्रक्रियेमध्ये पाच टप्प्यांचा समावेश आहे.

१) संस्थांतर्गत निर्मित ज्ञान किंवा माहिती तसेच बाहेरील संस्था संघटना कडून (External sources) ज्ञान संपादन करणे.

२) रिफायनिंग : संपादन केलेले ज्ञान रिपॉझिटरीमध्ये साठवण्यापूर्वी त्याचे महत्व जाणून घेण (Refining) व त्या नंतर अशा ज्ञानाची साठवणूक व संघटन करणे.

३) ज्ञानाची प्रतिप्राप्ती : रिपॉझिटरी मध्ये संघटीत केलेले ज्ञान आवश्यक घटकांना/वाचकांना उपलब्ध करून देणे.

४) ॲक्सेस (Access) : रिपॉझिटरी मधील ज्ञान उपलब्ध असणारी साधने तसेच त्यामधील माहिती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध पध्दतींचा वापर करणे.

५) ज्ञानाचे महत्व : ज्ञानाचे महत्व हे ज्ञानाचा वापर यावर अवलंबून आहे. त्यादृष्टीने रिपॉझिटरीज मधून ज्ञानाची निवड, ज्ञानाची गुणवत्ता व ज्ञानाचा वापर इत्यादी विषयी माहिती पुरविणे.

### *3.2 ज्ञान व्यवस्थापन उपक्रम*

ज्ञान व्यवस्थापनामध्ये काम करणा-या सेवक वर्गाची भुमिका व जबाबदारी योग्य त्या पध्दतीने निश्चित करणे महत्त्वाचे आहे. या व्यवस्थापनामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी योग्य ते नियोजन करणे आवश्यक आहे. पारंपारिक पध्दती किंवा कार्यपध्दती काही अंशी ज्ञानव्यवस्थापनामध्ये कालबाह्य होत आहेत. ज्या पध्दतीने ज्ञानाची निर्मिती, देवाणघेवाण व वापर केला जातो, त्या पध्दती आधुनिक आहेत. त्यामुळे ज्ञान व्यवस्थापनामध्ये प्रत्येकाची भूमिका निश्चित करून हे व्यवस्थापन संपूर्ण संस्थांतर्गत व्यापक दृष्टीने कसे वापरले जाते, हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. ज्ञान व्यवस्थापनाचे नियोजन, आराखडा व संस्थातर्गत विविध

चांगल्या रिपॉझिटरीची निर्मिती होऊ शकते. त्यामुळे चांगल्या रिपॉझिटरीची निर्मिती होऊन वापरही प्रभावीपणे होऊ शकतो.

### *3.3 रिपॉझिटरीचे व्यवस्थापन*

रिपॉझिटरी जेव्हा सुरू केली जाते त्यावेळेपासून रिपॉझिटरी मधील संग्रहाची वाढ निरंतर होत असते. त्यामुळे वेळोवेळी रिपॉझिटरीचे फेरसंघटन करणे आवश्यक ठरते. कालबाह्य झालेले ज्ञान, माहितीची साधने तसेच वापरात नसलेली माहितीची साधने रद्दबातल करणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर नवीन ज्ञानाची भर, निर्मिती व वाचकांच्या गरजेनुसार नवीन माहितीच्या साधनांचे संपादन करणे हे ही तितकेच महत्वाचे आहे. यशस्वी ज्ञान व्यवस्थापन हे ज्ञानाचे संघटन व फेरसंघटन या प्रक्रियांवर आधारभूत आहे. या प्रक्रिया अखंडितपणे सुरू ठेवणे म्हणजेच रिपॉझिटरीचे यशस्वीपणे व्यवस्थापन करणे होय.

### *3.4 डिजिटल तंत्रज्ञान व रिपॉझिटरी*

डिजीटल तंत्रज्ञानामुळे रिपॉझिटरीमध्ये अनेक फायदे अपेक्षित आहेत.

- अपेक्षित असलेले ज्ञान कमीतकमी वेळात कोणत्याही ठिकाणापासून उपलब्ध करता येते.
- ज्ञानाचे वर्गीकरण, सूची तसेच ज्ञान साठवण्याच्या पध्दती निश्चित करता येतात व विविध ज्ञानाचे युनिटस् जोडणे शक्य होते.
- प्रलेखामधील कंटेंटस, विविध पध्दतीमध्ये सादर करता येतात. ज्याद्वारे अपेक्षित अर्थ वा वापर निश्चित करता येतो.

### *4.रिपॉझिटरीची कार्ये :*

रिपॉझिटरीची प्रमुख कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) विविध क्षेत्रांना ज्ञानाचा पुरवठा करून त्या क्षेत्रामधील उपक्रम व संशोधन यांना उत्तेजन देणे.

२) आवश्यक असणारे ज्ञान व माहिती सातत्याने उपलब्ध करणे.

३) संशोधन, अध्ययन व अध्यापन यांच्या गुणात्मक वाढीमध्ये योग्य ते योगदान देणे.

४) अद्यावत माहिती व तंत्रज्ञान तसेच माहितीच्या दळणवळण पध्दतींचा वापर करून प्रभावीपणे ज्ञानसंकलन, संवर्धन व प्रसारण प्रक्रिया यशस्विरित्या पार पाडणे.

५) इलेक्ट्रॉनिक व डिजीटल माहितीची साधने यांचा प्रभावीपणे वापर करून अचून ज्ञानाचा शोध, प्रसार व वाचकांना अपेक्षित असलेल्या फॉरमॅटमध्ये ते उपलब्ध करून देणे.

### *5.रिपॉझिटरीचे प्रकार :*

विशिष्ट निकष डोळयासमोर ठेवून केलेले रिपॉझिटरीचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

#### *5.1 वाचक समूह :*

वाचक समूह डोळयासमोर ठेवून रिपॉझिटरी स्थापन करता येते. उदा. संशोधक,अध्यापक अध्ययन करणारे असे वाचक डोळयासमोर ठेवून योग्य त्या ज्ञान साधनांची रिपॉझिटरी स्थापन करता येते.

#### *5.2 साधन समूह :*

वेगवेगळी माहितीची साधने घेऊन रिपॉझिटरी स्थापन केली जाते. उदा. प्राथमिक साधने,(संशोधन अहवाल, पेटेंटस, स्टॉडर्ड्स, प्रबंध, तांत्रिक अहवाल इ.) इलेक्ट्रॉनिक साधने, विषय डेटा बेसिस, विशिष्ट विषयातील माहितीची साधने इत्यादीनुसार रिपॉझिटरी निर्माण करता येते.

#### *5.3 व्याप्ती :*

रिपॉझिटरीची व्याप्ती लक्षात घेऊन रिपॉझिटरी स्थापन केली जाते. उदा. वैयक्तिक रिपॉझिटरी, विभागीय रिपॉझिटरी, संस्था अंतर्गत रिपॉझिटरी, विविध संस्थांअंतर्गत (विभागीय) रिपॉझिटरी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इत्यादी प्रकारच्या रिपॉझिटरी स्थापन केल्या जातात.

#### *5.4 प्राथमिक कार्यानुसार :*

रिपॉझिटरिच्या प्राथमिक कार्यानुसार रिपॉझिटरी स्थापन केली जाते. उदा. माहितीच्या साधनांची उपलब्धता, डिजिटल साधनांचे संपादन, माहितीच्या संप्रेषनाच्या आधुनिक पध्दती, माहितीच्या साधनांचे आदान प्रदान व वापर इत्यादी निकष (कार्ये) लक्षात घेऊन रिपॉझिटरीची स्थापना केली जाते.

६.संस्थांतर्गत रिपॉझिटरीची कांही उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत.

१.नॅशनल लायब्ररी ऑफ इंडिया.

२.नॅशनल अर्काईव्हज ऑफ इंडिया.

३.सेंट झेवियर्स कॉलेज, गोथल्स इंडियन लायब्ररी ॲन्ड रिसर्च सेंटर.

४.इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बेंगलोर.

***संदर्भसूची***

1.Arnepalli, Kaladhar. “Knowledge Management and knowledge Repositories : Role of Management Libraries” Digital libraries in Knowledge management ed. By Sreekumar, M.G. et..al.., New Delhi, Ess Ess Pub, 2006, pp.335.
2.Doctor, Gayatri. “Institutional Repositories – A new paradigm to sharing information” Digital libraries in knowledge management, ed. By Sreekumar, M.G. et..al, New Delhi, Ess ess Pub, 2006 PP. 513.
3.Patel, Yatrik et al., “Institutional Digital Repositories E. Archives : INFLIBNET initiative in India” digital libraries in knowledge management ed. By Sreekumar, M.G. et...al New Delhi, Ess Ess Pub, 2006 pp.542.
4.Rajashekhar, T.B., “ Inferoperable Institutional digital research repositories knowledge organization, information systems, and other essays ed. By Raghavan, K.S. and Prasad, K.N., New Delhi, Ess Ess Pub 2006 pp.171

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org